# सकाळ



**अमरावती :** येथे संत गाडगेबाबा विद्यापीठात स्तुती प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. पी. ए. गरांडे, वर्षा नाथर, आर. जी. सोनकवडे, सी. डी. मायी.

# 'स्तुती'मुळे ६७०० संशोधकांना नवी दिशा'

**कोल्हापूर, ता. १८ :** स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमामुळे देशभरातील सहा हजार ७०० संशोधकांना नवी दिशा मिळाली आहे. ते केवळ १३ पीएमयू संस्थांनी करून दाखविले, असे प्रतिपादन केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या (डीएसटी) रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंटच्या प्रमुख डॉ. प्रतिष्ठा पांडे यांनी केले. शिवाजी विद्यापीठ आणि अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठातर्फे आयोजित स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. सी. डी. मायी, 'स्तुती' चे समन्वयक शिवाजी विद्यापीठाचे प्रा. आर. जी. सोनकवडे प्रमुख उपस्थित होते.

प्रा. मायी, डॉ. सोनकवडे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्र- कुलगुरू प्रा. व्ही. एस. चौबे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. वर्षा नाथर, टी. आर. देशमुख, पी. ए. गरांडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 JAN 2023 पुढारी

# देशभरातील ६७०० संशोधकांना नवी दिशा

## प्रा. सोनकवडे : स्तुती प्रशिक्षणामुळे शिवाजी विद्यापीठाचा वाढला नावलौकिक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

देशभरातील स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमामुळे आतापर्यंत ६७०० स्पर्धकांनी प्रशिक्षण घेतले आहे. यातून त्यांना संशोधनाप्रती नक्कीच एक नवीन दिशा मिळाली आहे, हे देशभरातील केवळ १३ पीएमयू संस्थांनी करून दाखवले आहे, असे प्रतिपादन डॉ. प्रतिष्ठा पांडे यांनी केले. अमरावती विद्यापीठाच्या आवारात स्तुती प्रशिक्षण कार्यक्रम झाला. यावेळी डॉ. पांडे बोलत होते. यावेळी त्यांनी शिवाजी विद्यापीठ आणि प्रा. सोनकवडे यांचे विशेष कौतुक केले.

केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे व शिवाजी विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या यांच्या वतीने स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. सी. डी. मायी प्रमुख पाहुणे म्हणून, तर केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या रिसर्च अँड डेव्हलपमेंटच्या प्रमुख डॉ. प्रतिष्ठा पांडे व शिवाजी विद्यापीठाचे स्तुती समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते. स्तुती कार्यक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक भारतभर वाढत आहे. कोल्हापूर आता भारताच्या अगदी काश्मीरपासून केरळपर्यंत त्याचप्रमाणे जोधपूर आणि इंदोरच्या आयआयटीसारख्या संस्थेमध्ये देखील पोहोचले आहे.

आपल्याकडे असणारे अनेक प्रतिभावान संशोधक आणि त्यांचे संशोधन एकत्रितरीत्या मांडले पाहिजे; जेणेकरून नवसंशोधकांना याचा उपयोग होईल, असे मत कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे, मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. सी. डी. मायी यांनी नोंदवले.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी पात्र ठरलेला कमला कॉलेजच्या मुलींचा संघ. सोबत प्रशिक्षक-मार्गदर्शक.

# शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी कमला कॉलेजचा संघ पात्र

कोल्हापूर : कर्मवीर हिरे कॉलेज गारगोटी तर्फे मौनी विद्यापीठात झालेल्या कोल्हापूर विभागीय महिला क्रिकेट स्पर्धेत कमला कॉलेजच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला. या संघाची निवड शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय स्पर्धेसाठी झाली आहे. पात्र संघात रुक्सार सय्यद (कर्णधार), भक्ती किल्लेदार (विकेटकिपर), मनाली बागीलकर, सनोबर मुल्ला, मनीषा हेटकाळे, आम्रपाली कांबळे, आसमा कुरणे, प्रज्ञा कांबळे, वेदिका पाचंगे, गायत्री कोळी-बरगाळे, प्रज्ञा चोपडे, सानिका पाटील, आर्या मोरे, स्नेहा शिंदे, आरती पाटील यांचा समावेश आहे.